(१)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४१, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

क्र.मजीप्रा/२००९/सभा-११४/(९०)/आ.४

दिनांक : २०.७.२००९

प्रति,
मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.
सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

**विषय : मंडळवार दि.२१.७.०९ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११४ व्या सभेचे इतिवृत्त.**

महोदय,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मंगळवार दि.२१.७.२००९ रोजी झालेल्या ११४ व्या सभेचे इतिवृत्त यासोबत पाठविण्यांत येत आहे. सदर इतिवृत्ताबाबत आपले काही अभिप्राय असल्यास, ते या कार्यालयास कृपया त्वरीत कळवावेत.

सदर अभिप्राय महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आगामी बैठकीमध्ये विचारार्थ सादर करण्यांत येतील.

आपली विश्वासू,
उ.प्र.महाजन
(उ.प्र.महाजन)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

सोबत : ११४ व्या सभेचे इतिवृत्त.

१. वि.स.व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रमबाब क्र.३, ५, व आयत्यावेळची कार्यक्रमबाब क्र.२ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

२. अधीक्षक अभियंता, मुख्यालय, म.जी.प्रा., मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रमबाब क्र. ६ व आयत्यावेळची कार्यक्रमबाब क्र. १ व ३ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

३. उप मुख्य लेखा अधि. (१) व (२) म.जी.प्रा., नवी मुंबई.

४. आस्थापना अधिकारी (द.), म.जी.प्रा., मुंबई.

आपणांस विनंती करण्यांत येते की, आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या पुढील कार्यक्रमबाब क्र. ४ वर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल या शाखेकडे त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

५. कायदा व कामगार अधि., म.जी.प्रा., नवी मुंबई.

६. प्रशासकीय नि आस्था.अधि., म.जी.प्रा., नवी मुंबई.

७. मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कार्यासन अधि./कक्ष अधिकारी यांच्या माहितीसाठी.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११४ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची ११४ वी सभा मा. मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक २१/७/२००९ रोजी संपन्न झाली. या सभेस मजीप्राचे खालील सदस्य उपस्थित होते.

१. मा. श्री.अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने सौ.जयलक्ष्मी चेक्कला, सहसचिव, पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
३. प्रधान सचिव, (वित्त व सुधारणा ) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.ज.द. जोशी, अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
४. अति. प्रधान सचिव, सार्व.आरोग्य विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.वि.रा. वेदपाठक, उप सचिव, सार्व.आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
५. प्रधान सचिव,ग्राम विकास विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.दि.ग.मोरे, उप सचिव, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
६. श्री. संजय दहासहस्त्र, सदस्य सचिव, म.जी.प्रा., मुंबई.

या व्यतिरिक्त सदर सभेस खालील मजीप्राचे अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.

१. श्री.डी.सी.सुर्यवंशी, विशेष कार्य अधिकारी तथा मुख्य अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. श्री.हेमंत चं. लांडगे, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, ठाणे
३. श्री.व्ही.आर.कल्याणकर, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, पुणे
४. श्री.एन.एस.केरकर, मुख्य अभियंता, मजीप्रा प्रादे.विभाग, नाशिक
५. श्री.प्र.वा.पांढरीपांडे, वि.स. व मु.ले.अ., म.जी.प्रा., नवी मुंबई.
६. सौ.उषा प्र. महाजन, मुख्य प्रशासकीय अधिकारी, म.जी.प्रा., मुंबई.
७. श्री. बा.शि. पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.
८. श्री.बी.के.सवाई, अधीक्षक अभियंता (मुख्यालय), म.जी.प्रा., मुंबई.

मा.मंत्री, जलसंपदा, पा.पु. व स्व. तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

सही/-
**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.१ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११३ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.**

दिनांक २६ मे, २००९ रोजी संपन्न झालेल्या ११३ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ११३ व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक २६ मे, २००९ रोजी संपन्न झालेल्या ११३ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले होते, त्या निर्णयाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. तद्नंतर केलेल्या या कार्यवाहीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत..**

सदर कार्यक्रम बाबींमधील मुद्यांबाबत वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी बैठकीमध्ये उहापोह केला. याबाबत चर्चा होऊन दि.२१/५/२००९ ते ३०/६/२००९ या कालावधीत प्रस्तावात नमूद केल्याप्रमाणे अल्प व दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.४ : दि.१/१/२००६ पासून सुधारीत वेतनश्रेणी मंजूर करण्याबाबत सहाव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या अनुषंगाने राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली सुधारीत वेतनश्रेणी/वेतन संरचना मजीप्रातील कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत.**

दि.१/१/२००६ पासून राज्य शासकीय व इतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आलेली सुधारीत वेतनश्रेणी/वेतन संरचना मजीप्रातील कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबतची सदर कार्यक्रम बाब मंजूरीसाठी सादर करण्यात येत असल्याबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

सदस्य सचिव
**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

सदर वेतनश्रेणी लागू केल्यास, प्रतिवर्षी अंदाजे रु.२४ कोटी एवढा जादा आर्थिक भार पडणार असून, तो मजीप्राच्या उत्पन्नातूनच भागवावा लागणार आहे. मजीप्राची सध्याच्या आर्थिक स्थितीचा विचार करता, या खर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठी मजीप्राने प्रचलित कार्यपध्दतीत बदल करणे, तसेच उत्पन्न वाढविणेसाठी विविध उपाययोजना आखल्या आहेत व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी Performance Management Plan तयार करण्यात येणार आहे. या कार्यवाहीचा विचार करुन, सन २००९-१० ते सन २०१३-१४ पर्यंतच्या संभाव्य कार्यवाहीनुसार मजीप्रास रु.१८९३.४८ कोटी इतके उत्पन्न अपेक्षित असून, त्यामधून मजीप्राचा सर्व मार्गांनी जसे- आस्थापना/देखभाल दुरुस्ती व इतर खर्च यासाठी येणारा रु.१५६६.२९ कोटी इतका खर्च वजा जाता अंदाजे रु.३२७ कोटी इतकी बचत अपेक्षित आहे. याबाबींचा विचार करता मजीप्रास सदर वेतनश्रेणी लागू करण्यास मान्यता प्रदान करण्यात यावी अशी विनंती मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास केली.

सदर कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती संभाव्य उत्पन्नामध्ये, शासनाकडून मजीप्रामार्फत ग्रामीण पाणी पुरवठा योजनांची देखभाल व दुरुस्ती करीत असतांना येणारी तुट भरुन काढण्यासाठी शासनाकडून मिळणारे प्रोत्साहन अनुदान म्हणून दर्शविलेली अंदाजित रु.१२६ कोटी रक्कम वगळणे आवश्यक असल्याचे चर्चेत ठरले. तथापि, सदरची रक्कम वगळूनही अपेक्षित बचत ही रु.२०१ कोटी इतकी आहे. या अनुषंगाने चर्चा होऊन सदर कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात येऊन संचालक मंडळाने सुचविल्यानुसार आवश्यक ते बदल करुन प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी सादर करुन मंजूरी प्राप्त करुन घेण्याचे निर्देश देण्यात आले. या कार्यक्रम बाबीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

प्राधिकरणातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना (परिशिष्ट-अ) मध्ये दर्शविलेली सुधारित वेतनसंरचना मंजूर करण्याच्या प्रस्तावास प्राधिकरण मंजूरी देत आहे. आणि सदस्य सचिव यांना याबाबत शासनाची अनुमती मिळविण्यासाठी प्राधिकृत करण्यांत येत आहे.मात्र सुधारणांसहित उत्पन्न वाढीसाठी मजीप्रातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी सर्वंकष प्रयत्न करावेत व त्यासाठी सदस्य सचिव यांनी सनियंत्रणासाठी Proformance Management Plan तयार करावा व हा सहाव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीचा एक भाग राहिल.

प्राधिकरण आणखी असाही ठराव करीत आहे की, महाराष्ट्र शासन यापुढे भविष्यात महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २००६ ला ज्या काही सुधारणा करुन, शासकीय कर्मचाऱ्यांना या सुधारित वेतनसंरचना अनुसरुन, जे विविध भत्ते जसे, महागाई भत्ता, प्रवासभत्ता, शहर भत्ता, घरभाडे भत्ता व इतर काही अनुषंगीक भत्ते व सवलती मंजूर करण्यासंबंधीचे जे काही आदेश निर्गमीत करेल ते सर्व आदेश प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांनाही आपोआप लागू होतील व यावर होणारा खर्चही प्राधिकरणाला मिळणाऱ्या ई.टी.पी. चार्जेसच्या रक्कमेमधून व अन्य उत्पन्नातून भागविण्यात यावा.

| | |
|---|---|
| **मा. अध्यक्ष तथा** | **सदस्य सचिव** |
| **मंत्री, पा.पु. व स्व.** | **म.जी.प्रा.** |

दिनांक १/१/२००६ ते ३१/३/२००९ पर्यंतच्या थकबाकीची रक्कम पुढील ५ वर्षात समान हप्त्यात कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात जमा करावयाची तरतुद शासन निर्णयामध्ये असली तरी सुध्दा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे असलेल्या निधी उपलब्धतेनुसार या थकबाकीची रक्कम जमा करावयाचे व दिनांक १/४/२००९ पासूनची थकबाकी रोखीने प्रदान करावयाचे अधिकार सदस्य सचिव यांना राहतील.

या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

कार्यक्रम बाब क्र.५ : **महाराष्ट्र शासनाने सहाव्या वेतन आयोगाच्या संदर्भात सेवानिवृत्ती वेतन व इतर लाभाच्या बाबतीत केलेल्या सुधारीत तरतुदी प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत.**

५ व्या वेतन आयोगाच्या शिफारशीनुसार सेवानिवृत्ती वेतन व निवृत्ती विषयक इतर लाभाच्या बाबतीत केलेल्या सुधारित तरतुदी मजीप्राच्या अधिकारी कर्मचाऱ्यांना शासनाच्या दि.३१/१२/२००१ च्या शासन निर्णयाव्दारे लागू करण्यात आल्या आहेत. याच तरतुदी मजीप्रातील निवृत्तीवेतन धारकांनाही लागू करण्यात आल्या आहे.

आता ६ व्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशीच्या अनुषंगाने, राज्य शासनाने त्यांच्या सेवानिवृत्ती वेतन व इतर निवृत्ती लाभ लागू केला आहे. याच तरतुदी मजीप्रातील अधिकारी/कर्मचारी यांना लागू करण्याबाबतचा सदरचा प्रस्ताव असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर तरतुदी लागू केल्यास, दरवर्षी अंदाजे रु.९.६० कोटी इतका आर्थिक भार पडणार आहे. यानुषंगाने चर्चा होऊन सादर केलेल्या कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात येऊन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव :

महाराष्ट्र शासनाचे वित्त विभागाचे शासन निर्णय क्र.सेनिवे-१००९/प्र.क्र.२९/ सेवा-४, दि.५ मे,२००९ आणि शासन निर्णय वित्त विभाग क्र. सेनिवे-१००९/३१/सेवा-४, दि.५ मे,२००९ व शासन निर्णय क्र.सेनिवे-१००९/प्र.क्र.३३/सेवा-४, दि.२२ जून,२००९ अन्वये शासनाने निवृत्ती वेतनात सुधारणा करण्याबाबतच्या तरतुदी ज्याप्रमाणे राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना लागू करण्यात आल्या आहे त्या प्राधिकरणाच्या सर्व निवृत्त कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबतच्या प्रस्तावास प्राधिकरण मंजूरी

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

सदस्य सचिव
**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

देत आहे. तसेच उपरोक्त शासन निर्णयामध्ये भविष्यात ज्या काही सुधारणा करुन आदेश निर्गमित होतील ते सर्व प्राधिकरणाच्या निवृत्ती वेतनधारकांना आपोआप लागू होतील.

दिनांक १/१/२००६ ते ३१/३/२००९ पर्यंतच्या थकबाकीची रक्कम पुढील ५ वर्षात समान हप्त्यात जरी निवृत्ती वेतन धारकांना प्रदान करावयाची तरतुद शासन निर्णयामध्ये असली तरी सुध्दा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे असलेल्या निधी उपलब्धतेनुसार या थकबाकीची रक्कमा प्रदान करावयाचे अधिकार सदस्य सचिव यांना राहतील.

यानुषंगाने प्रस्ताव शासनास सादर करुन मंजूरी प्राप्त करुन घेण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.६ : न्हावा शेवा पाणी पुरवठा योजनेची देखभाल दुरुस्तीची कामे योजनेच्या घसारा निधीतुन हाती घेणेबाबत.**

जेएनपीटी, सिडको वसाहती , पनवेल नगरपरिषद त्याचप्रमाणे मार्गस्थ १८ गांवे व इतर किरकोळ ग्राहक्रांना या न्हावाशेवा प्रादे. पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा करण्यात येत असून, सदर योजनेची देखभाल व दुरुस्ती मजीप्रामार्फत करण्यात येत आहे.

या योजनेंतर्गत टाकण्यात आलेली पाईपलाईन ही सुमारे २० वर्षांपूर्वी पासूनची असून, या क्षेत्रातील क्षारयुक्त हवामानामुळे पाईपची जाडी कमी होऊन ती २ मि.मी. इतकी झाली आहे, परिणामी सदरची पाईपलाईन फुटणे, गळत्या होणे या बाबी वारंवार घडत आहेत. त्यामुळे वित्त हानी होण्याबरोबरच योजनेवरील ग्राहकांना पुरेसा व आवश्यक त्या दाबाने पाणी पुरवठा करता येत नाही. त्यामुळे सदरच्या पाईपलाईनची दुरुस्ती करणे अत्यावश्यक झाल्याने प्रस्ताव कार्यक्रम बाबीव्दारे सादर करण्यात येत असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केल.

तथापि, सदर दुरुस्तीची कामे करण्यासाठी मजीप्राकडे इतर कोणत्याही स्त्रोतातून आवश्यक तो निधी उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे या योजनेवरील घसारा निधीमधून दुरुस्तीची कामे हाती घेण्याचे प्रस्तावित आहे. सद्यस्थितीत या योजनेवर अंदाजे रु.१०.५० कोटी इतका घसारा निधी शिल्लक असून, दोन टप्प्यात करावयाच्या या कामासाठी येणारा अंदाजे रु.७.८० कोटी इतका खर्च शिल्लक घसारा निधीमधून करण्याचे प्रस्तावित असल्याचेही संचालक मंडळास अवगत केले.

यावर चर्चा होऊन पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

| | |
|---|---|
| **मा. अध्यक्ष तथा**<br>**मंत्री, पा.पु. व स्व.** | **सदस्य सचिव**<br>**म.जी.प्रा.** |

ठराव -

म.जी.प्रा.च्या मालकीच्या न्हावा शेवा प्रादेशिक पाणी पुरवठा योजनेच्या उपरोक्त प्रस्तावित केल्यानुसार दोन टप्प्यातील करावयाच्या रु.७.८० कोटी किंमतीची जलवाहिनी बदलण्याची कामे हाती घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे सदरची कामे ही योजनेवर उपलब्ध असलेल्या रु.१०.५० कोटी इतक्या घसारा निधीमधून (Depreciation Funds) मधून हाती घेण्यासही मान्यता देण्यात येत आहे.

यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्यावेळेची कार्यक्रम बाब क्र.१ : पुणे शहरालगतच्या शिवणे-कोंढव-धावडे व इतर दोन गावांकरीता प्रा.पा.पु. योजना, ता.हवेली,जि.पुणे.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर योजनेसाठी शासनाच्या दि.१६/६/२००९ च्या पत्रान्वये लागू करण्यात आलेली १०% इतकी लोकवर्गणी पैकी योजनेत समाविष्ठ ग्रामपंचायतीनी भरलेली लोकवर्गणी वजा जाता उर्वरित लोकवर्गणी मजीप्राने भरुन योजनेची देखभाल व दुरुस्ती पाणीपट्टी वसूलीसह मजीप्राने करण्याचे निर्देश शासनाने दिले आहेत.

मूळ मंजूर योजनेत पाणी पुरवठा हा ९० लिटर दरडोई दरदिनी या दराने व १६ तासांसाठी पंपिंग संकल्पित करण्यात आले होते. तथापि, सदर पाणीपुरवठ्याचा दर ७० लिटर या दराने पुनर्सुधारीत केल्यास योजनेची किंमत रु.१२.६४ लक्षने कमी होऊन ती रु.१३५५.०५ लक्ष ढोबळ इतकी येते. यानुसार १०% लोकवर्गणीपोटी रु.१३५.५१ लक्ष होत असून, यापैंकी ग्रामपंचायतीने भरलेली रु.४४.३५ लक्ष वजा जाता रु.९१.१६ लक्ष इतकी लोकवर्गणी मजीप्राने भरण्याचे प्रस्तावित आहे. सदरची लोकवर्गणी दोन वर्षात उपलब्ध करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी नळजोडणीसाठीची अनामत रक्कम व पाणीपट्टीचे दर सुधारीत करुन अंतीम करण्यात येतील.

तेव्हा सदर कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्याची विनंती सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास केली. चर्चेअंती मान्यता प्रदान करण्यात येऊन पुढीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

ठराव -

शासनाचे पत्र क्र.पापुयो-२००९/प्र.क्र.०८/पापु-१७/ दि.१६.६.०९ च्या पत्रानुसार दिलेल्या आदेशानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण पुणे यांचे कार्यक्षेत्रातील कोंढवे-धावडे- उत्तमनगर -शिवणे व न्यू कोपरे या गावासाठी पाणी पुरवठा योजना राबवून व कार्यान्वित करुन म.जी.प्रा.ने आवश्यक तो

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

लोकवर्गणीचा हिस्सा भरण्यास व योजनेची दैनंदिन देखभाल व दुरुस्ती करण्यासाठी व पाणीपट्टी आकारुन योजना स्वयंपूर्ण करण्याच्या दृष्टीने नळ जोडणीची अनामत रक्कम व पाणीपट्टीचे दर ठरविण्यासाठी सदस्य सचिव, म.जी.प्रा. यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्यावेळेची कार्यक्रम बाब क्र.२: वाढीव व विस्तारीत आष्टा नळ पाणी पुरवठा योजना, जि. सांगली थकबाकी वरील व्याज व दंडनीय व्याज माफ करणेबाबत.**

आष्टा नळ पाणी पुरवठा योजनेच्या थकबाकीवरील व्याज व दंडनीय व्याज, दि.१/८/२००८ रोजी लागू केलेल्या सुधारीत निर्भय योजनेतील लाभ नगरपरिषदेस पूर्वलक्षीप्रभावाने देऊन, माफ करण्याबाबतची सदर कार्यक्रम बाब असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर चर्चे दरम्यान वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांनी, सदर निर्भय योजनेचा लाभ पूर्वलक्षीप्रभावाने दिल्यानंतर थकबाकीची रु.९२,४००/- रक्कम तातडीने भरणे आवश्यक राहील असे संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिले. या मा.अध्यक्ष यांनी सदरची थकबाकी वसूल करण्यासाठी मुख्य अभियंता, पुणे यांनी पाठपुरावा करुन रक्कम वसूल करण्याबाबत निर्देश दिले.

अंतीमत: सदर कार्यक्रम बाबीबाबत चर्चा होऊन कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात येऊन खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.

ठराव -

आष्टा नगरपालिकेचे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडे थकीत असलेली रु.९२,४०० इतकी रक्कम भरणा केल्यास दंडनीय व्याजाची नगरपालिकेस सूट देण्यात यावी. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्यावेळेची कार्यक्रम बाब क्र.३: सदस्य सचिव, मजीप्रा, मुंबई यांचे कार्यालयीन वापरासाठी नवीन वाहन खरेदी करण्यास परवानगी मिळणेबाबत.**

सद्यस्थितीत सदस्य सचिव यांना कार्यालयीन कामकाजासाठी वापरात असलेले इंडिगो वाहन क्र.एमएच-०४/६६७९ हे वाहन सन २००४ साली खरेदी करण्यात आले असून, सदर वाहनाने सुमारे १.२५ लक्ष कि.मी. इतका प्रवास केला आहे. त्याचप्रमाणे जुलै-२००५ साली झालेल्या अतिवृष्टीत आलेल्या प्रलयात हे वाहन पुर्णत: पाण्याखाली होते. त्यावेळी या वाहनाच्या इंजिनाचे पाण्यामुळे बरेच नुकसान झाले होते. तथापि, वेळोवेळी दुरुस्त्या करुन वाहन वापरात आहे. मात्र सदर वाहन वारंवार नादुरुस्त होत आहे. त्यामुळे कार्यालयीन कामकाजामध्ये वारंवार व्यत्यय येत असून, सदस्य सचिवांसाठी नवीन होंडा

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**

सिटी किंवा तत्सम वाहन खरेदी करणे आवश्यक असल्याचे संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिले व त्यांनुषंगाने संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी नमूद केले.

सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन नवीन होंडा सिटी किंवा तत्सम वाहन खरेदी करण्याकरिता संचालक मंडळाने मान्यता दिली असून खालीलप्रमाणे ठराव संमत करण्यात आला.

**ठराव -**

म.जी.प्रा. च्या सदस्य सचिव यांच्या कार्यालयीन कामकाजाच्या वापरासाठी नवीन होंडा सिटी किंवा तत्सम वाहन खरेदी करण्याकरीता संचालक मंडळाची मान्यता देण्यात येत असून पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

बैठकीसमोर अन्य विषय नसल्याने, उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

--------------

**मा. अध्यक्ष तथा**
**मंत्री, पा.पु. व स्व.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**